# प्रकरण दुसरे

## मराठीतील शब्दचित्रे

## स्वरूप व व्याप्ती

## :- प्रकरण दुसरे -:

### मराठीतील शब्दचित्रे :- स्वरुप व व्याप्ती :

मराठी वाङ्:मयाच्या आधुनिक कालखंडात शब्दचित्र अथवा व्यक्तिचित्र हा वाङ्:मय प्रकार विकसित झाला. प्रारंभीच्या काळात व्यक्तिचित्रांचा समावेश लघुकथा, कहाणी, आठवणी, निबंध इत्यादी साहित्य प्रकारातच केला जात असे. कालांतराने व्यक्तिचित्र हा वाङ्:मय प्रकार म्हणून प्रचलीत होऊ लागला. तसतशी त्याची स्वतंत्र वैशिष्टये, लक्षणे स्पष्ट होऊ लागली. अनेकदा कथा, चरित्र, आठवणी आणि व्यक्तिचित्रे यांच्यातील सीमारेषा पुसट होताना दिसतात. तरी व्यक्तिचित्रांची म्हणून स्वरुप आणि व्याप्ती स्पष्ट करता येते.

इंग्रजी वाङ्:मयामध्ये शब्दचित्रांचा प्रारंभ १७ व्या शतकात झाला. चित्रकार रंग आणी रेषा यांच्या माध्यमातून व्यक्तिचित्र साकारतो. म्हणून त्याला शब्दचित्र म्हटले गेले. 'Sketch'या इंग्रजी शबदाला पर्यायी म्हणून शब्दचित्र हा शब्द मराठीमध्ये रुढ झाल्याचे दिसते.

"ए रिडर्स गाईड टू लिटररी टर्म्स" या ग्रंथात शब्दचित्र हे कथा, नाटक, निबंध इत्यादी प्रकाराचे अल्प विकसित रुप असल्याचे सांगून यामध्ये या वाङ्:मय प्रकाराची पूर्णपणे वैशिष्ठये असत नाहीत. असे म्हटले आहे.

**Sketch - A brif story play or essay not a fully developed as the Typical example of These generes. Among the Commonest types are the character. Sketch, a short**

description of an interesting Personality and the sketch composed for a review, a simple playlet. Satrizing some tropical trend of event. 1

- A Reader's Guide to literary terms.

Karl Beckson and Arthur Ganzt.

हिंदीतील प्रसीध्द समीक्षक डॉ. गोविंद त्रिगुणायत यांनी शब्दचित्रा विषयी विस्तृत चर्चा केली आहे. एखाद्या वस्तुचे, घटनेचे वा व्यक्तिचे भावस्पर्शी चित्रण म्हणजे शब्दचित्र असे प्रतिपादन केले आहे.

" रेखाचित्र वस्तु, व्यक्ति अथवा घटना का शब्दोंद्वारा विनिर्मित वह मर्मस्पर्शी और भावमय रूपविधान है जिसमे कलाकार का संवेदनशील हृदय और उसकी सूक्ष्म पर्यवेक्षण दृष्टी अपना निजीपन उँडेलकर प्राण प्रतिष्ठा कर देती है। " २

शास्त्रीय समीक्षा के सिध्दांत ,

डॉ. गोविंद त्रिगुणायत

तर डॉ. भगीरथ मिश्रा यांनी आपल्या "काव्यशास्त्र" या ग्रंथामध्ये, कोणत्याही घटना, प्रसंगाचे वा व्यक्तिचे आपल्या अंत:करणावर प्रभाव पाडणारे चित्रण म्हणजे शब्दचित्र असल्याचे सूचित केले आहे.

"अपने संपर्क मे आये किसी विलक्षण व्यक्तित्व अथवा संविदना को जगानेवाली सामान्य विशेषताओंसे युक्त किसी प्रतिनिधी चरित्र के मर्मस्पर्शी स्वरूप को देखी सुनी या संकलीत घटनाओंकी पृष्ठभूमि मे इस प्रकार उभारकर रखना की उसका हमारे हृदय में निश्चित प्रभाव हो जाए

रेखाचित्र या शब्दचित्र कहलाता है। " [3]

काव्यशास्त्र
डॉ. भगीरथ मिश्रा.

शब्दचित्रांच्या आकृती बंधा संबंधी मराठीमध्ये साहित्यिक, टीकाकारांनी आपली मते व्यक्त केली आहे. शब्दचित्रांच्या आकृतीबंधा विषयीच्या आपल्या विवेचनात, शब्दचित्रात जिव्हाळा आणि अलिप्तता असली पाहिजे यावर भर देताना अ.ना. देशपांडे यांनी म्हटले आहे की. " सर्जनशील स्वरूपाच्या इतर सर्व वाड्:मयीन कृती प्रमाणे शब्दचित्र निर्मितीत ही एकाच वेळी जिव्हाळा आणि अलिप्तता असली पाहिजे" [4]

शब्दचित्रा विषयी "वाड्:मयातील वायस्थळे" या आपल्या टीका ग्रंथात वा.ल. कुलकर्णी यांनी शब्दचित्रांच्या चर्चे संदर्भात "वस्तुदर्शन की वस्तु निरूपण" या शीर्षकाखाली असे विवेचन केले आहे की, "शब्दचित्रांचा विषय एखादा प्रसंग, एखादे स्थळ किंवा एखादी व्यक्ती असाच सर्व साधारणपणे असतो. " [5] असे म्हटल्यानंतर वा.लं. नी वस्तुदर्शन, वस्तुनिरूपण वस्तुनिर्मिती या संकल्पनांचा विस्तार केलेला आहे. त्यांच्या मते केवळ घटना वा प्रसंग आणिव्यक्ती यांच्याशी वस्तुनिष्ठता आणि अलिप्तता ही कौशल्याने साधल्या शिवाय शब्दचित्र जिवंत होऊ शकत नाही. केवळ घटना प्रसंगाचे वर्णन म्हणजे शब्दचित्र नसून त्याच्या संवेदनाशी एकरूप होऊन लेखक ती वस्तु साकार करीत असतो अशा घटना प्रसंगाशी लेखक भावनात्मक तऱ्हेने एकरूप होऊन त्याची एकमेव परिणामकारकता मनावर

बिंबवून ठेवतो. तोच खरा व्यक्तिचित्रकार म्हणावे लागते असे वा.लं.ना म्हणावयाचे आहे.

प्रा.अ.म.जोशी यांनी " स्वाभावचित्रे म्हणजे चरित्राची छोटी आवृत्ती असे म्हणावयास हरकत नाही" [६] असे मत व्यक्त करताना स्वभाव चित्रा विषयीच्या आपल्या विवेचनात स्वभावाच्या विविध पैलूवर प्रकाश टाकणे हेच स्वभाव चित्रकाराचे प्रमुख कार्य असून त्यामध्ये स्वभाव रेखनाला प्राधान्य असते. स्वभाव चित्र या नावावरूनच त्याचा बोध होतो असे प्रतिपादन केले आहे.

"शब्दचित्रात लेखक अधिक वस्तुनिष्ठ असतो, आणि आपली आत्मपरता तो सूचकबद्धतेने व्यक्त करतो" [७] हे सांगताना डॉ.वा.भा पाठक यांनी शब्दचित्रातील वातावरणाला जास्तीच महत्व असल्याचे दर्शविले आहे. ज्या लेखकात भोवतालच्या परिस्थितीशी समरस होण्याची विशेष शक्ती आहे. तोच उठावदार शब्दचित्रे लिहू शकतो. म्हणूनच लघुकथे पेक्षा जिवंत शब्दचित्र निर्माण करणे कलेच्या दृष्टीने जसे अवघड आहे. तसेच शब्दचित्र व लघुकथा यातील सूक्ष्म भेद शोधणे अवघड कार्य ठरते असे त्यांना वाटते.

"चरित्र आणि आत्मचरित्र" [साहित्यरूप] या ग्रंथात डॉ.सदा क-हाडे यांनी व्यक्तिचित्र वा स्वभावचित्र हा चरित्र लेखनाचा एक प्रकार मानून त्यातील सीमा रेषांचे दिग्दर्शन करताना व्यक्तिच्या जीवनाचा अथपासून इतिपर्यंतचा वृत्तांत हा जीवन चरित्रात समाविष्ट होतो तर

जीवनातील निवडक घटना प्रसंगाच्या आधारे व्यक्ति चरित्रातून व्यक्तीचे यथार्थ दर्शन घडविले जाते. यामध्ये स्वभाव वैशिष्ठये व वृत्ती-प्रवृत्ती दारे व्यक्तिचित्र रेखाटले जाते. चरित्रांतर्गत व्यक्ति विकसनात असणारी एक प्रकारची गतीमानता व्यक्तिचित्रणात नसते. म्हणून "व्यक्तिचित्र म्हणजे चरित्रांतर्गत व्यक्तिदर्शनाची संक्षिप्त आवृत्ती असते"[८] असे ते मानतात दिवंगत व्यक्तीच्या जीवन चरित्राचे प्रासंगिक स्मरण आणि त्या निमित्ताने आढळणा-या "मृत्युलेखन" या लेखन प्रकाराचे अंत: स्वरुप व्यक्तिचित्रा सारखे असल्याचे नमूद करताना त्यांनी आचार्य अत्रे यांनी लिहिलेल्या मृत्यु लेखाकडे निर्देश केला आहे. तर वृत्तांत लेखनाचा विशेष प्रकार म्हणून गणल्या जाणा-या "मुलाखती" व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने त्यांना लक्षणीय वाटतात.

तसेच ज्या काळात शब्दचित्रे लिहिण्याचे स्वरुप स्पष्ट झाले नव्हते त्या काळात, रघुवीर सामंत यांच्या काळात व्यक्तिचित्रे किंवा शब्दचित्रे या संबंधी अंधुक किंबहुना त्या निर्मितीची प्रक्रिया काय असावी याची पुसट जाणीव असताना त्या दृष्टीने रघुवीर सामंत यांनी "हृदय" या आपल्या पहिल्या पुस्तकात व्यक्तिचित्रा विषयीची चर्चा करताना म्हटले आहे की, " शब्दचित्र साधारणपणे लहान असते असे म्हटले तरी हा त्याचा फरक विशेष नव्हे. शब्दचित्र हे प्रथम शब्दानी काढलेले चित्र असते नंतर ते कथानक वगैरे मुळे कदाचित, लघुकथेतही मोडेल परंतु त्यात कथानक असले किंवा नसले तरी ते अगदी गौण होय. म्हणजेच कथानकाला शब्दचित्रांत पार्श्वभूमीचे

स्थान असते. त्यातील शब्दरचना विशेष सूचक व अर्थगर्भ असते.[९] असे म्हणून शब्दचित्रे निर्माण करताना बरीच अवघड गोष्ट असल्याचे त्यांच्या विवेचना वरून दिसते.

आपल्या "तारांगण" या पुस्तकातील "तारांगणाकडे दृष्टिक्षेप" मध्ये शब्दचित्रा विषयी त्याच्या स्वरूपा विषयी अधिक माहिती दिली आहे. एखाद्या घटने विषयीची आपली मते आपल्या आवडी निवडी ज्या मनात डोकावतात त्या एकाची घटना चित्रात्मक रितीने चितारताना कलाकृतीत प्रतिबिंबीत करावीशी वाटते. मात्र लघुनिबंधाच्या थाटाची व्यक्तिगत मतप्रचारी झाक त्यातून सूचित होते. परिणामी त्या लेखनाला लघुनिबंध वा शब्दचित्र या दोन्ही जातीत न टाकता "चित्रबंध" म्हणावे असे वाटते. हे सांगताना सामंत लिहितात "लेखकाला आपल्या मनाचा एखादा सूक्ष्म कप्पा एखाद्या चित्रात बांधून सूचक पध्दतीने आपल्या वाचकासमोर मांडावयाचा असेल तर तेथे शब्द चित्रापेक्षा किंवा लघुनिबंधापेक्षा त्याला "चित्रबंधा" चाच आश्रय करावा लागेल असे मला प्रांजळपणे वाटते."[१०]

वरील वाङ्मयीन अभ्यासकांच्या विचारांचा मागोवा घेतला असता शब्दचित्रे वा व्यक्तिचित्रे या संदर्भात त्यांनी व्यक्त केलेली मते गृहीत धरल्याला व्यक्तिचित्र, शब्दचित्र, स्वभावचित्र, रेखाचित्र या संबंधी कोणीही अभ्यासकाने निश्चित स्वरूपाची व्याख्यान करता लेखकाच्या विशिष्ट वस्तूशी एकरूप होणाऱ्या अंतःप्रेरणा आणि त्याचा परिणामकारक अविष्काराला विशिष्ट घटनेकडे पाहण्याची लेखकाची अंतरदृष्टी, आणि ती साकार करीत असताना परिणामकारक

राला
शब्दयोजना हे ज्या लेखकाला किंवा कलाका–प्रभावीपणे साध्य होईल तो लेखक व्यक्तिचित्र जिवंतपणे साकार करू शकेल असा रोख दिसतो. केवळ वस्तु दिग्दर्शनाने वा निरूपणाने व्यक्तिचित्र रंगणार नाही तर लेखक त्या वस्तूशी किती प्रामाणिकपणे एकरूप झालेला आहे. त्यावर शब्दचित्राचे यश अवलंबून आहे.

## : संदर्भसूची :

1) A Reader's Guide to literary terms. Thomes and Hadson, Page No. 204 - 205.

२] शास्त्रीय समीक्षा के सिध्दांत, एस. चंन्द्र ॲण्ड कंपनी, पृष्ठ - ४९२.

३] काव्यशास्त्र, विश्वविद्यालय प्रकाशन,

४] आधुनिक मराठी वाड्:मयाचा इतिहास भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन पृष्ठ - ४९२.

५] वाड्:मयातील वादस्थळे.

६] चरित्र आत्मचरित्र तंत्र आणि इतिहास, सुविचार प्रकाशन, पृष्ठ - १५

७] टीका आणि टीकाकार, अनमोल प्रकाशन पृष्ठ - ४०१.

८] चरित्र आणि आत्मचरित्र [साहित्यरूप] , लोकवाड्:मय गृह पृष्ठ - ५१

९] हृदय, भारतगौरव ग्रंथ माला पृष्ठ - ६

१०] तारांगण, पारिजात प्रकाशन पृष्ठ - १०२.